SP REFRACTORIES LIMITED

(A Group of Mr. Prabodh S Kale)

CIN: L51909MH2007PLC167114

Registered Office: M-10, M-11/1 & M-11/2, MIDC, Hingna, Nagpur-440016

Office No.: 07104-235388/235399 **Mob No:** 942210352

Email: sprefractory@gmail.com/info@sprefractories.com **Website:** www.sprefractories.com

To
The Manager,
Listing Department,
NSE Limited,
Exchange Plaza, C-1, Block G,Bandra Kurla
Complex, Bandra (E), Mumbai-400051

Symbol: SPRL

Dear Sir/ Madam,

Sub: Notice published by way of an advertisement in respect of 19th Annual General Meeting (AGM) of the Company.

Ref: Regulation 44 and 47 read with Regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015

Dear Sir/ Madam,

Pursuant to regulation 44 and 47 read with regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith the copies of newspaper advertisements published in “Dainik Mahasagar” (Marathi edition) and the “Financial Express” (English edition) on Monday, 24th August, 2026 informing about 19th Annual General Meeting of the Company and e-voting.

For your information and record.
Kindly acknowledge and oblige.

For SP Refractories Limited

NIKITA JADWANI
Digitally signed by NIKITA JADWANI
Date: 2026.08.24 13:57:54 +05'30'

Nikita Suresh Jadwani

Company Secretary cum Compliance Officer

Mem No: A75532

महापौरांच्या गीत गायनाने श्रावण उत्सवाला वेगळीच ऊर्जा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने महिलांच्या दैनंदिन जबाबदाऱ्या आणि व्यस्त जीवनशैलीतून त्यांना आनंदाचे काही क्षण अनुभवता यावेत, आप्तमैत्रिणींसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवता यावा आणि त्यांच्यातील आत्मविश्वास व सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने महापौर श्रावण उत्सव सोहळा मनपातर्फे आयोजित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने नंदनवन येथील त्रिशताब्दी उद्यानात उत्साहपूर्ण वातावरणात शुक्रवार रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रावणाच्या निमित्ताने आयोजित या आनंदोत्सवात महिलांनी विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, मनपाच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महिलांसाठी प्रथमच अशा स्वरूपाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे, हनुमान नगर झोन सभापती ज्योती देवघरे, नेहरू नगर झोन सभापती सीमा ढोमणे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती रुपाली ठाकूर, हनुमान नगर झोन सभापती ज्योती देवघरे, नगरसेविका मंगला मस्के, माजी नगरसेविका स्नेहल बिहारे, मनीषा नगरधनकर, रजनी वानखेडे, माजी नगरसेविका विशाखा जोशी, माजी नगरसेविका वंदना भगत, माजी नगरसेविका स्वाती आखतकार, प्रगती पाटील, सविता मते, क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे, कार्यकारी अभियंता सविता गणोरकर यांच्यासह मनपाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना महापौर यांनी सांगितले की, आपल्या दैनंदिन कामात व्यस्त असलेल्या शहरातील सर्व मैत्रिणींसाठी(महिलांसाठी) महानगरपालिकेच्या सर्व महिला नगरसेविका आणि कर्मचारी यांच्या प्रयत्नांतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे नाव लिहितांना जरी महापौर असा उल्लेख असा तरी परिश्रम सर्व महिला नगरसेविकांचे आहे. यावेळी बोलतांना रोजच्या धगधगीतून वेळ काढून आपण सर्व जणी कार्यक्रमाला तयार होऊन नटून-सजून आल्या म्हणून सर्व उपस्थित महिलांचे कौतुक केले. विशेष म्हणजे यावेळी महापौरांनी गीत गायले. ज्यामुळे कार्यक्रमाला वेगळाच आपलेपणा आणि ऊर्जा प्राप्त झाली.

यावेळी महिलांनी विविध कार्यक्रमात सहभाग घेऊन आनंद लुटला. यावेळी टास्क, श्रृंगार, डान्स , गाणे , मजेशीर खेळ घेण्यात आले. नागपूर महानगरपालिकेद्वारा सहभागी महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या. विविध मनोरंजनात्मक उपक्रमांनी कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी सर्व विजेत्या महिलांना "पैठणी साडी व डिनर सेट" देऊन गौरविण्यात आले. संजना नवघरे, प्रीती, संध्या, मंजुषा सदावर्ते या विविध खेळाच्या विजेत्या ठरल्या.

बुटीबोरीत मेट्रोच्या साहित्याच्या चोरीचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी
टाकळघाट, दि. २३ :

बुटीबोरी परिसरात मेट्रोच्या कामासाठी ठेवण्यात आलेल्या लोखंडी पाइप चोरीच्या प्रकरणाचा बुटीबोरी पोलिसांनी छडा लावत तीन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे चोरीच्या घटनेचा उलगडा झाला असून, सुमारे ३८ हजार ८०० रुपये किमतीचे ४० लोखंडी पाइप चोरीला गेल्याचे समोर आले आहे.

प्राप्त माहितीनुसार दि २० ऑगस्ट ला बुटीबोरी परिसरातील राहुल एंटरप्रायझेस समोर मेट्रोच्या कामासाठी ठेवण्यात आलेले लोखंडी पाइप चोरीला गेले होते. अज्ञात चोरट्यानी सुमारे ३८ हजार ८०० रुपयांचे ४० लोखंडी पाईप चोरी करून बुटीबोरी पोलिसांना आव्हान दिले होते.सबब चोरीचे गांभीर्य ओळखून घटनेची माहिती मिळताच बुटीबोरी पोलिसांनी प्रकरण गांभीयार्ने घेत तपासाला सुरुवात केली. पोलिसांनी परिसरातील उपलब्ध माहिती आणि मिळालेल्या सुरागांच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला होता,पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीची खातरजमा करून पोलिसांनी संशयितांवर लक्ष ठेवले. त्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई करत २२ ऑगस्ट ला तीन आरोपींना ताब्यात घेत अटक केली.मयूर बागरे, वय २५ वर्षे,महेश ढोमणे, वय २८ वर्षे, दोघेही रा. बुटीबोरी व महेश गोबरकर, वय ३० वर्षे, रा. सातगाव अशी अटकेतील आरोपीचे नावे आहेत.संबंधित कारवाई पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जीवन लाकडे, सपोनि किशोर भुजाडे, ए पि आय विनोद जाधव, पोलीस कॉन्स्टेबल युनूस खान, कुणाल पारधी, गौरव मोकडे, माधव इंगळे, गजू पंचभुते आणि माधव गुट्टे यांनी केली.

आरोपीकडून चोरीच्या मालाबाबत चौकशी करण्यात येत असून चोरीचा माल नेमका कुठे नेण्यात आला, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात आली आणि या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

कळमेश्वर बस स्थानकावर एसटी बसचा मागील भाग कोसळला

■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर , दि. २३ :

कळमेश्वर बस स्थानकावर एसटी महामंडळाच्या बसची दुरवस्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. बसचा मागील भाग अचानक कोसळल्याची घटना समोर आली असून, या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

कळमेश्वर बस स्थानक आवारात रविवार ता.23 रोजी सकाळी 6:30 वाजताचे दरम्यान एसटी बसचा मागील भागाचा लोखंडी पत्र्याचा तुकडा अचानक कोसळल्याने आवारात उभे असणारे प्रवासी थोडक्यात बचावले.

नागपूर घाट रोड आगाराची बस क्र. एम एच 14. बीटी 50 18 ही लिंगा लाडई ते कळमेश्वर मार्गे नागपूरला जात असताना हल्टिंग दरम्यान एसटी बसचा मागील भागाचा लोखंडी पत्र्याचा तुकडा अचानक गळून पडल्यामुळे मोठा आवाज झाला व प्रवासी घाबरले, बसमध्ये प्रवासी नसल्यामुळे कोणाला इजा व जीवितहानी झाली नाही. बसची अवस्था पाहता ही बस प्रवाशांच्या वाहतुकीसाठी रस्त्यावर धावत होती का, असा सवाल उपस्थित होत आहे. तर बसच्या बाहेरील पत्र्यांसह आतील भागाचीही मोठ्या प्रमाणात झीज झालेली दिसून येत आहे.

एसटी महामंडळाकडून प्रवाशांना सुरक्षित आणि दर्जेदार सेवा देण्याचे आश्वासन दिले जाते. मात्र, कळमेश्वर येथील या घटनेने प्रत्यक्षात रस्त्यावर धावणाऱ्या काही बसेसच्या देखभाल-दुरुस्तीचा प्रश्न गंभीर असल्याचे अधोरेखित केले आहे. जुन्या व जीर्ण झालेल्या बसेसची वेळोवेळी तपासणी केली जाते का, त्यांची फिटनेस चाचणी कशी केली जाते आणि प्रवाशांच्या जीविताच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाते का, असे प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित होत आहेत.

बसचा मागील भाग अचानक कोसळणे ही किरकोळ बाब नसून, थेट रस्त्यावर प्रवासादरम्यान अशी घटना घडली असती तर मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता आली नसती. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या घटनेची गांभीयार्ने दखल घेऊन जीर्ण व धोकादायक बसेसची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

एसटी ही ग्रामीण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रवासाचा प्रमुख आधार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी किंवा बसगाड्यांची कमतरता यापेक्षा प्रवाशांची सुरक्षितता महत्त्वाची आहे.

कळमेश्वर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर धावणाऱ्या जुन्या बसेसचे फिटनेस ऑडिट करून धोकादायक बसेस तातडीने सेवेतून हटवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या घटनेनंतर एसटी महामंडळ प्रशासन नेमकी काय भूमिका घेते आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

अल्पवयीन मुलाकडून तीन दुचाकी जप्त

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २३ :

एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या तपास पथकाने अल्पवयीन मुलाकडून चोरी करण्यात आलेल्या तीन दुचाकी जप्त करून तीन वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावला. या कारवाईत एकूण १ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे एका १६ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालकाला त्याच्या पालकासह ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने एमआयडीसी पोलिस ठाण्यातील दोन तसेच वाडी पोलिस ठाण्यातील एका वाहनचोरीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती दिली.

पोलिसांनी त्याच्याकडून होंडा एसपी १२५ (एमपी-२२-झेडएच-५१६७), हिरो होंडा स्प्लेंडर (एमएच-३१-बीजे-८१७८) आणि होंडा सीबी शाईन (एमएच-३१-एफके-६६१६) या तीन दुचाकी जप्त केल्या. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हे क्रमांक ७५७/२०२६ व ७५८/२०२६, तर वाडी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६२/२०२५ दाखल आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोकुल महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक पंकज सयाम, पोलिस हवालदार प्रमोद गिरी, विक्रांत देशमुख, प्रविण फलके, प्रमोद सोनवणे आणि पोलिस अंमलदार अंकुश कनोजिया यांच्या पथकाने ही कारवाई केली. सहायक पोलिस आयुक्त यशवंत नलवडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. अल्पवयीन मुलाच्या पालकांचे पोलिस ठाणे स्तरावर समुपदेशन करण्यात येत आहे.

आरपीएफ जवानाच्या सतर्कतेने अपहरणाचा उलगडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

भोपाळ येथून अपहरण करून नागपुरात आणलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीची नागपूर रेल्वे स्थानकावर आरपीएफ जवानाच्या सतर्कतेमुळे सुटका करण्यात आली. मुलीला घेऊन मुंबईकडे पळून जाण्याच्या तयारीत असलेला १८ वर्षीय युवकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. प्लॅटफॉर्म क्रमांक ८ जवळ संशयास्पद अवस्थेत उभ्या असलेल्या युवक आणि मुलीची चौकशी केल्यानंतर अपहरणाचा हा धक्कादायक प्रकार समोर आला.

शुक्रवारी नागपूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक ८ जवळ एक युवक आणि अल्पवयीन मुलगी उभी असल्याचे आरपीएफ आरक्षक चंदन निर्मल यांच्या निदर्शनास आले. दोघांच्याही चेहऱ्यावर भीतीचे भाव दिसत असल्याने त्यांनी त्यांच्याकडे विचारपूस केली. चौकशीदरम्यान मुलगी अल्पवयीन असल्याचे समोर आले. त्यामुळे आरपीएफ जवानांनी तत्काळ दोघांनाही लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात दिले. लोहमार्ग पोलिसांनी सखोल चौकशी केली असता मुलगी भोपाळ येथील असल्याचे स्पष्ट झाले. लोहमार्ग पोलिस निरीक्षक गौरव गावंडे यांनी तातडीने भोपाळ पोलिसांशी संपर्क साधला.

त्यावेळी भोपाळमधील छोला मंदिर पोलिस ठाण्यात मुलीच्या अपहरणाची तक्रार दाखल असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले. त्यानंतर भोपाळ पोलिसांचे पथक नागपूरकडे रवाना झाले. शनिवारी पथक नागपूर रेल्वे पोलिस ठाण्यात दाखल झाले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर लोहमार्ग पोलिसांनी युवक आणि अल्पवयीन मुलीला भोपाळ पोलिसांच्या ताब्यात दिले. आरपीएफ जवानाच्या सतर्कतेमुळे अपहरण झालेल्या मुलीचा शोध लागून ती सुरक्षितपणे पोलिसांच्या ताब्यात आली.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त वांजरा येथे भव्य रॅली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त बमलेश्वरी नगर, वांजरा, उत्तर नागपूर येथे रविवारी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी विचारांना अभिवादन करण्यासाठी या रॅलीत समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी घटकांच्या प्रश्नांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रभावीपणे वाचा फोडणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या योगदानाबद्दल उपस्थितांनी आदर व्यक्त केला.

त्यांच्या समतावादी आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाला लहुजी शक्ती सेना विदर्भ सचिव राजेश डोंगरे, लहुजी शक्ती सेना नागपूर जिल्हा कोर कमिटी अध्यक्ष नितीनजी वाघमारे, लहुजी शक्ती सेना नागपूर शहर अध्यक्ष रमेश पाडन तसेच सामाजिक कार्यकर्ते अजय इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीच्या आयोजनासाठी अजय शनेश्वर, राज डोंगरे, अंकुश वानखेडे, रोशन काळे, रुपेश खांडाळे, विवेक काळे, पृथ्वीराज डोंगरे, दिलीप काळे, रामकृष्ण वानखेडे, मीराताई डोंगरे, नेहाताई काळे, नंदाबाई काळे, लताबाई शनेश्वर, विनोद गोरले, इंदुबाई वानखेडे, पूजाताई डोंगरे, सपनाताई डोंगरे, शारदाताई खंडाळे, प्रिया वानखेडे, अशोकराव खडसे, बबीताताई खडसे, वनिता इंगळे, निलेश वानखेडे आणि रेश्मा वानखेडे यांनी परिश्रम घेतले.

लॉयन्स क्लबतर्फे दोन गरजु कुटुंबांना शैक्षणिक मदत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

21 ऑगस्ट विश्व ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ नागपूर हेरिटेज आणि सिद्धी विनायक पब्लिसिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी ८० व ९०च्या दशकातील लोकप्रिय गीतांचा मोफत कार्यक्रम सार्वजनिक हॉल, लक्ष्मीनगर, नागपूर येथे नुकताच उत्साहात पार पडला.

कार्यक्रमासाठी विजया वैदिशकर यांना स्टार सिंगर म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी कितने भी तू कर ले सितम हे गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली कार्यक्रमाच्या रंगतदार वातावरणात विवेक प्रतापे यांनी छू कर मेरे मन को,सुनील माहूरकर यांनी ये ज़िंदगी उसे लगा लो, दत्तात्रय वझरकर यांनी तेरे जैसा यार कहा तर शशिकांत वाघमारे यांनी जब से तेरे नैना ही लोकप्रिय गाणी सादर करून उपस्थितांची दाद मिळविली आणि कार्यक्रमात चांगलीच धम्माल उडवून दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत दोन गरजु कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्यात आली. सोमलवार शाळेत इयत्ता नववीत शिकणाऱ्या सई धनंजय लेंगे हिला वही,पुस्तके व स्कूल बॅग साठी लायन विवेक व स्नेहल प्रतापे यांच्या तर्फे ५,०००ची आर्थिक मदत देण्यात आली.

तसेच लायन्स क्लबचे सदस्य सुनील व स्मिता माहूरकर यांचा मुलगा व सून प्रसाद व मुक्ता माहूरकर यांच्या तर्फे इयत्ता दुसरीतील सानन्वी डहाट आणि इयत्ता चौथीतील विहांश डहाट यांना शिक्षणासाठी ५,०००ची मदत भेट म्हणून देण्यात आली. कार्यक्रमाला ज्ञानचंद्रनपरसन दत्तात्रय वझरकर, क्लब अध्यक्ष विजया वैदिशकर, उपाध्यक्ष अनघा वैद्य क्लब प्रशासक विवेक वैद्य, विवेक व स्नेहल प्रतापे,सुनील व स्वाती माहूरकर शशिकांत व मृणाल वाघमारे, तसेच सिद्धी विनायक पब्लिसिटीचे संचालक समीर पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

वंदे भारतच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

पाचपावली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाचपावली रेल्वे क्रॉसिंगजवळ शुक्रवारी दुपारी नागपूरहून बिलासपूरकडे जाणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसची धडक बसून ७३ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. विठ्ठलराव ढोणे (७३, रा. एनआयटी चौक, वैशालीनगर) असे मृताचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वंदे भारत एक्स्प्रेस नागपूरहून सुटल्यानंतर पाचपावली रेल्वे क्रॉसिंगजवळून कमी वेगाने पुढे जात होती. त्याचवेळी रेल्वे रुळावर एक व्यक्ती चालताना लोको पायलटला दिसला. त्यांनी हॉर्न वाजवून त्याला सावध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, विठ्ठलराव यांनी हॉर्नकडे दुर्लक्ष केले. लोको पायलटला गाडी थांबविण्याची संधी मिळण्यापूर्वीच रेल्वेची विठ्ठलराव यांना धडक बसली. धडकेमुळे ते गंभीर जखमी होऊन खाली कोसळले. त्याच दरम्यान रेल्वेच्या चाकाखाली आल्याने त्यांचा मृत्यू झाला. लोको पायलटने तत्काळ ब्रेक लावले.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त निर्भय प्रभात फेरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी २० ऑगस्ट रोजी समितीतर्फे निर्भय प्रभात फेरी काढून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येते. यंदा डॉ. दाभोळकर यांच्या निधनाला १३ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूरच्या वतीने संविधान चौक ते जुने मॉरिस कॉलेज आणि पुन्हा संविधान चौक अशी निर्भय प्रभात फेरी काढली. या प्रभात फेरीत नागपूर जिल्ह्यातील विविध शाखांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, शिवाजीनगर, टेकऑफ सिटी, प्रेरणानगर, फुलमतीनगर तसेच इतर शाखांमधील कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. मुख्य अतिथी अशोक जांभुळकर आणि ज्ञानेश्वर रक्षक यांच्या हस्ते प्रभात फेरीमधे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रभात फेरीच्या समारोपानंतर झालेल्या कार्यक्रमात ज्ञानेश्वर रक्षक, राम काळे, चित्तरंजन चौरे, प्रा. पुष्पा घोडके, रामभाऊ डोंगरे, प्रा. संध्या राजूरकर आणि इतर मान्यवरांनी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या कार्याला उजाळा देत विचार व्यक्त केले. अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी विचारांची चळवळ पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी देवानंद बडगे, देवयानी भगत, शोभा पाटील, सुषमा शेवडे, मंगला गाणार, कांबळे, प्रीती तिरपुडे, शिल्पा मकेश्वर आणि इतर अनेक सदस्यांनी डॉ. दाभोळकर यांच्या कार्याला अभिवादन करणारी गीते सादर केली. डॉ. सुनील भगत यांनी प्रभात फेरीचे तसेच कार्यक्रमाचेही संचालन केले. उमेश चिट्टे यांनी प्रभात फेरी आणि कार्यक्रमाची छायाचित्रे काढली. ज्योत्स्ना बनसोड यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सांगतेनंतर ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या शैलेश नरवाडे दिग्दर्शित जयंती २ या चित्रपटाचे प्रमोशन करण्यात आले. यावेळी जयंती २ चे विशेष कलाकार किरण काशिनाथ, अक्षय खोब्रागडे आणि इतर कलाकार उपस्थित होते. विजयकांत पाणबुडे यांनी जयंती २ या चित्रपटाबद्दल सविस्तर माहिती दिली. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर जनतेने त्याला भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन उपस्थितांनी केले.

यानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाच्या खटल्याला गती देऊन आरोपींना लवकरात लवकर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून केली. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित या निर्भय प्रभात फेरीच्या माध्यमातून अंधश्रद्धाविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवादी विचार आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला.

Rules on availing agri subsidies amended after flaws detected

HARIKISHAN SHARMA
New Delhi, August 23

ALMOST TWO MONTHS after an investigation by *The Indian Express* revealed a Union Minister and a serving Central government secretary's kin availing subsidy for their cucumber farms, the Centre has amended the 'Scheme Guidelines of Commercial Horticulture and Cold Storage Schemes' of the National Horticulture Board (NHB). It has revised the definition of 'family' – bringing within its ambit the subsidy applicant's spouse, father, mother, sons and daughters – and has made holders of constitutional posts, serving ministers, MPs, MLAs, mayors, district panchayat chiefs and government employees ineligible for financial assistance under NHB schemes.

The NHB, an autonomous body under the Ministry of Agriculture and Farmers Welfare, amended the scheme guidelines on August 21.

"With a view to rationalise financial assistance, ensure equitable distribution of benefits, prevent duplication of subsidy, and make the implementation of the Schemes more transparent and effective, following amendments in the Scheme Guidelines shall be applicable with immediate effect," read a circular issued by the NHB.

The scheme — Development of Commercial Horticulture through Production and Post-Harvest Management of Horticulture Crops — is aimed at promoting commercial farming (for profit) of horticultural crops on a large scale. The crops under the scheme are three types of vegetables – capsicum, cucumber and tomato; and eight varieties of flowers including rose, lilium and chrysanthemum. The scheme offered a maximum subsidy of 50 per cent, capped at Rs 1 crore per family, of the project cost.

Under the new guidelines, the government has made clear that five categories of people shall not be eligible for NHB assistance under NHB Schemes.

"Family members of persons falling in the above categories may, however, avail one-time assistance, subject to the applicable provisions of the revised definition of family," the new guidelines said.

The revised definition of 'family' is as follows: "For the purpose of determining eligibility under NHB Schemes, the term 'family' shall comprise the applicant's spouse, father, mother, sons and daughters."

As per the old guidelines, the term 'family' was defined as "the husband, wife, and dependent minor children."

On June 27, The Indian Express reported that Bhagirath Choudhary, Minister of State in the Union Ministry of Agriculture and Farmers' Welfare, availed Rs 99 lakh subsidy for his farm in 2025 under the NHB's scheme 'Development of Commercial Horticulture through Production and Post-Harvest Management of Horticulture Crops.' A month later, Choudhary returned the subsidy amount to the government.

The investigation by The Indian Express also showed that the wife, son and mother of senior IAS officer Naresh Pal Gangwar, who is currently serving as the Secretary, Department of Animal Husbandry and Dairying (DAHD), were among the beneficiaries of the scheme. The government had appointed Gangwar as the Higher Education Secretary on July 23, but even before his joining, his appointment was cancelled (on August 10).

Govt may release buffer onion stock, says Khare

SANDIP DAS
New Delhi, August 23

TO REIN IN the sharp rise in retail onion prices, the government may start offloading onions from its buffer stock in the open market, Consumer Affairs Secretary Nidhi Khare said. "Looking at the recent rise in prices, we are preparing to start Kanda Express for the bulk transportation of onions by rail from buffer stocks kept in Maharashtra to key consuming centres across the country," Khare told *FE*.

She said there were sufficient stocks with both the government and farmers to meet demand in the coming months.

According to the Department of Consumer Affairs, the average retail price of onions rose to ₹41.64 per kg on Saturday, up 45% from a year earlier. Retail prices have risen by more than 19% over the past month, while prices in Delhi-NCR have crossed ₹55 per kg.

Centre pushes states to speed up PNG adoption

THE PETROLEUM MINISTRY has asked states and Union Territories to provide district-level administrative support to accelerate the shift of households from LPG to PNG, seeking appointment of nodal officers to coordinate with gas distributors and OMCs. In an August 21 letter to state chief secretaries, Petroleum Secretary Neeraj Mittal said PNG, as a safer, cleaner and more efficient cooking fuel, has an important role in advancing India's energy transition while reducing the logistics burden associated with LPG distribution.

"PNG brings a more efficient cooking fuel, playing a critical role in advancing the country's energy transition objectives. Its accelerated adoption contributes to reducing the logistics burden associated with LPG distribution and improving utilisation of CGD infrastructure created via substantial public and private investment," Mittal said in the letter. —PTI